मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# आमदार सुनील शेळके यांना मोदींचा आशीर्वाद 'विजयी भव'!

## आमदार शेळके यांच्या पाठीशी आता नरेंद्र मोदींचाही आशीर्वाद : पंतप्रधान मोदी यांनी दिला मावळातील भाजप मतदारांना थेट 'संदेश'

**पिंपरी | प्रतिनिधी**

नोव्हेंबर - मावळ विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस-भाजप- शिवसेना- आरपीआय-एसआरपी महायुतीचे उमेदवार आमदार सुनील शेळके यांना आज भाजपचे सर्वोच्च नेते व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून आशीर्वाद मिळाले.

महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी पंतप्रधान मोदी यांची आज (मंगळवारी) रात्री पुण्यातील स.प.महाविद्यालयाच्या मैदानावर जाहीर सभा झाली. या सभेतील भाषणानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पंतप्रधान मोदी यांना शेळके यांची औपचारिक ओळख करून दिली. त्यावेळी नतमस्तक होऊन शेळके यांनी मोदी यांचे आशीर्वाद घेतले. त्यानंतर हस्तांदोलन करत पंतप्रधानांनी



शेळके यांना विजयासाठी शुभेच्छा दिल्या.

त्यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ, रामदास आठवले, राज्याचे मंत्री चंद्रकांत पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

मावळमध्ये भाजपचे काही नेते महायुतीचे उमेदवार असलेल्या शेळके यांच्या विरोधात काम करीत आहेत. त्यामुळे सुरुवातीला भाजपचे निष्ठावान कार्यकर्ते व मतदारांमध्ये संभ्रमाचे वातावरण होते. महाविकास आघाडीने अपक्ष उमेदवार बापूसाहेब भेगडे यांना पाठिंबा दिल्यानंतर मात्र चित्र बदलले. भाजपचे बहुतांश कार्यकर्ते आता शेळके यांच्या प्रचारात सहभागी झाले आहेत. पंतप्रधान मोदी यांच्या आशीर्वादामुळे तालुक्यातील भाजपच्या सर्व कार्यकर्त्यांना व मतदारांना योग्य तो संदेश गेल्याचे मानण्यात येत आहे.

---

# आमच ठरलय.... नवनाथ ढवळे याचां नारा.. " व्हिजन " असणाऱ्या शंकर जगताप यांनाच पुनावळे करांचा पाठिंबा..!

## पुनावळे येथील अनेक हौसींग सोसायटी धारकांच्या सोसायटी मधे जाऊन , आमदार अश्विनिताई जगताप यांनी प्रत्यक्ष भेटी घेतल्या

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिंचवड विधानसभेचे भारतीय जनता पार्टी घटक पक्षांचे अधिकृत उमेद्वार माननिय शंकरभाऊ जगताप यांच्या प्रचारार्थ , आज रविवार दिनांक १० नोव्हेंबर २०२४ रोजी सपुर्ण दिवस भर पुनावळे येथील अनेक हौसींग सोसायटी धारकांच्या सोसायटी मधे जाऊन , आमदार अश्विनिताई जगताप यांनी प्रत्यक्ष भेटी घेतल्या . यावेळी त्याच्या समवेत भारतीय जनता पार्टी चे शहर उपाद्यक्ष - मा नवनाथ मारूती ढवळे उपस्थीत होते. यावेळी ग्रामस्थ व मी पुनावळेकर यांच्या वतीने मा नवनाथ ढवळे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. कचरा डेपोची समस्या सोडवल्याबद्दल पुनावळे वासीयांनी आमदार अश्विनी जगताप यांचे आभार मानले. व आमंच ठरलं आहे , असा नारा दिला....



व पुनावळे गावचा स्नियोजन बद्द विकास करण्यासाठी स्मार्ट व्हिजन असणारे महायुतीचे उमेदवार शंकर जगताप हेच या भागाचे आमदार असावेत. त्यासाठी आम्ही पुनावळेतील सर्व सोसायटी धारक एकदिलाने शंकर जगताप यांच्या पाठीशी उभे आहोत, असे आश्वासन पुनावळे गावातील सोसायटी धारकांनी दिले. तसेच पुनावळे वासियांची सर्वात मोठी कचरा डेपोची समस्या आमदार अश्विनी जगताप यांनी सोडविली. आणि त्यासाठी शंकर जगताप यांनीही नियोजनबद्ध पाठपुरावा केल्याबद्दल सर्वांनी आभार व्यक्त केले

प्रचारार्थ पुनावळे येथील या प्रचार दौऱ्यात अश्विनी जगताप यांनी पुनावळेमधील ट्रीन आर्क सोसायटी, श्रेयांश सोसायटी, जीके रोज मेन्शन, सरिशा, वि जे यशवन इन्फिनिटी, लेगसी उर्बनिया, पुणेवीले, सोमानी ड्रीम् होम, आकाशवन, वर्धमान पाम रोज, स्टांझा हौ सोसायटी, जावडेकर प्रोजेक्ट , यासह अनेक सोसायट्यांना भेट देऊन तेथील रहिवाशांसोबत संवाद साधला. यावेळी सोसायटी धारक म्हणाले की, ज्या पद्धतीने आमदार अश्विनी जगताप आणि शंकर जगताप यांच्या पाठपुराव्यामुळे येथील सर्वात गहन कचरा डेपोचा प्रश्न मार्गी लागला, त्याबद्दल पुनावळे गावातील प्रत्येक नागरिक तुमचा आभारी आहे. आणि यापुढेही पुनावळे गावातील सर्व समस्या सोडवून गावाचा स्मार्ट विकास करण्यासाठी पुनावळे गावातील आम्ही सर्व सोसायटीधारक एकदिलाने आणि एकजुटीने शंकर जगताप यांच्यासोबत आहेत, असा विश्वास उपस्थित सर्व सोसायटीधारकांनी अश्विनी जगताप यांना दिला. या दौऱ्या दरम्यान कामगार नेते सुरेश रानवडे, प्गतशील शेतकरी प्रधान काटे , राष्ट्रवादी पिंपरी चिंचवड शहर उपाध्यक्ष राजीव क्षीरसागर, विठ्ठल बरळ, सौरभ बिडवाई, अजित भोसले, अनिल वांबोरी, मुनमुन पोदार, ट्रिन आर्क सोसायटीचे चेअरमन सचिन भोसले, अशोक हराळे, विवेक पाटील, श्रीकांत गायकवाड, विजय टंडन, संकेत शर्मा, अमित खांडवे, श्रीयांस सोसायटीचे चेअरमन हर्ष मालवी, अजय निकम, अमित नवबते, सरिशा सोसायटीचे विनायक थोरात, विष्णू मोहिते, हितेश बांदल, गणेश कदम, अंशुमन दुबे, श्रेया १,२ सोसायटीचे विनायक गावडे, स्वप्रिल भामरे, प्रसाद कुलकर्णी, विकास सूर्यवंशी, जीके रोज मेन्शन सोसायटीचे लक्ष्मण व्यवहारे, कुशाग्र शर्मा, चंद्रकांत महाजन, श्री,सोनार, श्री.पांढरे यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महागाई, भ्रष्टाचार आणि बेरोजगारी थांबवण्यासाठी महायुतीला हद्दपार करा : सुप्रिया सुळे

## महाविकास आघाडीचे भोसरी विधानसभा मतदारसंघातील अधिकृत उमेदवार अजित गव्हाणे यांच्या प्रचारार्थ मोशी येथे खासदार सुप्रिया सुळे यांनी मार्गदर्शन केले

**पुणे | प्रतिनिधी**

आमचा संघर्ष वैयक्तिक नाही. महागाई, बेरोजगारी, अधिकार आणि भ्रष्टाचार या विरोधात आमची लढाई आहे. तळेगावात आलेला फॉक्सकॉन प्रकल्प भाजपने ओढून नेला. सहा लाख नोकऱ्या या भागातल्या मुलांना मिळणार होत्या. आमच्या मुलांच्या सहा लाख नोकऱ्या तुम्ही खाल्ल्या, तुम्हाला घालवल्याशिवाय आम्ही स्वस्त बसणार नाही असे खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या. पंधराशे रुपये देऊन दाम दुपटीने महागाई करणाऱ्या सरकारला महिला शक्तीच घरी बसवणार आहे असे देखील सुप्रिया सुळे म्हणाल्या.

महाविकास आघाडीचे भोसरी विधानसभा मतदारसंघातील अधिकृत उमेदवार अजित गव्हाणे यांच्या प्रचारार्थ मोशी येथे सोमवारी (दि.11) महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी खासदार सुप्रिया सुळे यांनी महिलांना मार्गदर्शन केले. अजित गव्हाणे यांच्या प्रचारार्थ महिलांची उल्लेखनीय उपस्थिती होती.यावेळी महिलांनी राम कृष्ण हरी वाजवा तुतारी असा जयघोष केला. व्यासपीठावर पक्षाचे शहराध्यक्ष तुषार कामठे, माजी महापौर मोहिनी लांडे, माजी आमदार विलास लांडे, उमेदवार अजित गव्हाणे, शिवसेना पुणे जिल्हा संघटिका सुलभा उबाळे, माजी नगरसेवक धनंजय आल्हाट, माजी नगरसेविका विनया तापकीर आदी उपस्थित होते. मेळाव्याच्या निमित्ताने शिवसेना पुणे जिल्हा संघटिका सुलभा उबाळे, माजी नगरसेविका प्रियंका बारसे, संगीता ताम्हाणे, माई काटे, स्वाती साने, स्वाती चिटणीस, रूपाली आल्हाट, मंदा आल्हाट, शुभांगी बोऱ्हाडे यांनी मनोगत व्यक्त केले



### दोन हजार कोटींचा खर्च करून ठाकरे यांचे मुख्यमंत्री पद काढून घेण्याचे पाप

» महाविकास आघाडी सरकार पाडण्यासाठी, माजी मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे यांचे मुख्यमंत्रीपद काढून घेण्यासाठी चाळीस आमदारांची 50 खोके देऊन खरेदी केली गेली. दोन हजार कोटी खर्च करून आमदारांना विकत घेतले असा गंभीर आरोप सुप्रिया सुळे यांनी केला. दोन हजार कोटींचा खर्च करून उद्धव ठाकरे यांचे मुख्यमंत्री पद काढून घेण्याचे पाप भाजपने केले. उद्धव ठाकरे यांना पदावरून खाली खेचणाऱ्यांना घरी बसवा असे आवाहन सुप्रिया सुळे यांनी केले.

सुप्रिया सुळे यावेळी म्हणाल्या, ही निवडणूक वैयक्तिक संघर्षासाठी नाही, तर आपल्या अधिकारांसाठी आहे. वाढती महागाई ,बेरोजगारी यामुळे सर्वसामान्य जनता बेजार झाली आहे. शिवसेना प्रमुख उद्धव ठाकरे यांनी आपण सत्तेत आल्यानंतर सर्वप्रथम तेलाचे भाव आवाक्यात आणू असे आश्वासन दिले आहे. महाविकास आघाडीचे सरकार हे सर्वसामान्यांचे सरकार आहे .रोजच्या जगण्यातले प्रश्न आम्हाला माहित आहे .त्यामुळे महिलांनी निर्धास्त होऊन महाविकास आघाडीच्या पाठीशी उभे राहणे गरजेचे आहे असे सुप्रिया सुळे म्हणाल्या. महागाईच्या मुद्द्यानंतर या राज्यातील वाढती बेरोजगारी हा महत्त्वाचा प्रश्न आहे. गेल्या दहा वर्षात या प्रश्नाची गुंतागुंत मोठ्या प्रमाणात वाढली आहे. आपल्या राज्यातील प्रकल्प दुसऱ्या राज्यात पळवले जात आहे. दुसऱ्या राज्यात प्रकल्प नेण्याबद्दल दुमत नाही. मात्र आमच्या मुलांच्या ताटातला घास हिसकावून नेण्याची भाजपची वृत्ती निंदनीय आहे. तळेगावात आलेला फॉक्सकॉन प्रकल्प यांनी गुजरातला पळवला आमच्या मुलांच्या ताटातला घास काढून नेण्याचे पाप या भाजपने केलेले आहे. आज हा प्रकल्प सुरू झाला असता तर आमच्या भागातील तरुणांना सहा लाखांहून अधिक नोकऱ्या मिळाल्या असत्या. आमच्या मुलांच्या नोकऱ्या खाणाऱ्या या भाजपच्या उमेदवारांना त्यामुळे घरी बसवायचे आहे. महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर महिलांना त्यांचे अधिकार देऊन सन्मान, स्वाभिमान जपण्याचे काम केले जाणार आहे असेही सुप्रिया सुळे म्हणाल्या. म्हणूनच येत्या 20 नोव्हेंबर रोजी पहिल्या क्रमांकाचे तुतारी वाजवणारा माणूस या चिन्हा समोरील बटन दाबून अजित गव्हाणे यांना भरघोस मतांनी विजयी करण्याचे महत्त्वाचे काम आपल्या महिला शक्तीने करायचे आहे असे आवाहन देखील सुप्रिया सुळे यांनी केले.

### वेळ येऊ द्या टप्प्यात करेक्ट कार्यक्रम करू

» 20 नोव्हेंबरनंतर माझे खरे रूप दाखवीन असे म्हणणाऱ्या आमदार महेश लांडगे यांना सुप्रिया सुळे यांनी नाव न घेता चांगले सुनावले. बघून घेण्याची भाषा कोणाला करता महिला शक्तीचे खरे रूप तुम्हाला अजून माहित नाही. वेळ येऊ द्या टप्प्यात करेक्ट कार्यक्रम करू असे देखील सुप्रिया सुळे म्हणाल्या.

### ... म्हणून अजित गव्हाणे यांना निवडून आणणार

» अजित गव्हाणे यांच्या प्रचारार्थ आयोजित मेळाव्यात महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी, शिवसेना व काँग्रेस पक्षातील महिला पदाधिकाऱ्यांनी महायुतीचा खरपूस समाचार घेतला.महिला सुरक्षा, महागाई, लाडकी बहीण योजना यावरून सत्ताधाऱ्यांचे चांगलेच वाभाडे काढले. पंधराशे रुपये देणार आणि दाम दुपटीने महागाई वाढवून ठेवणार त्यामुळे हे सरकार घालवायचे आहे असे महिला शक्तीने यावेळी ठणकावून सांगितले. महाविकास आघाडीचे सरकार आणण्यासाठी भोसरी विधानसभेतून अजित गव्हाणे यांना भरघोस मतांनी विजयी करणार असा निर्धार महिलांनी व्यक्त केला.

“ आगामी काळामध्ये महाविकास आघाडीला अपेक्षित असणारे काम शहरांमध्ये करायचे आहे. या शहरातील मुलांना चांगले शिक्षण मिळावे यासाठी शिक्षणाचा दर्जा सुधारायचा आहे. नामांकित शिक्षण संस्था आपल्या शहरात आल्या पाहिजेत या दृष्टीने पावले टाकायची आहेत. महिला भगिनींना सुरक्षित वातावरण देण्याबरोबरच युवकांच्या हाताला काम देणे ही महत्त्वाची जबाबदारी असणार आहे 'स्मॉल क्लस्टर'ची उभारणी शहरात करण्यासाठी प्रयत्न करणार आहे.

- अजित गव्हाणे, उमेदवार, महाविकास आघाडी, भोसरी विधानसभा

---

# पुनावळे गावचा स्मार्ट स्मार्ट व्हिजन असणाऱ्या शंकर जगताप यांनाच आमचा पाठिंबा..!

## कचरा डेपोची समस्या सोडवल्याबद्दल पुनावळे वासीयांनी मानले आमदार अश्विनी जगताप यांचे आभार

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुनावळे गावचा स्मार्ट विकास करण्यासाठी स्मार्ट व्हिजन असणारे महायुतीचे उमेदवार शंकर जगताप हेच या भागाचे आमदार असावेत. त्यासाठी आम्ही पुनावळेतील सर्व सोसायटी धारक एकदिलाने शंकर जगताप यांच्या पाठीशी उभे आहोत, असे आश्वासन पुनावळे गावातील सोसायटी धारकांनी दिले. तसेच पुनावळे वासियांची सर्वात मोठी कचरा डेपोची समस्या आमदार अश्विनी जगताप यांनी सोडविली. आणि त्यासाठी शंकर जगताप यांनीही नियोजनबद्ध पाठपुरावा केल्याबद्दल सर्वांनी आभार व्यक्त केले.

चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे महायुतीचे अधिकृत उमेदवार शंकर जगताप यांच्या प्रचारार्थ पुनावळे येथील सोसायट्यांमध्ये आमदार अश्विनी जगताप यांनी दौरा केला. या प्रचार दौऱ्यात अश्विनी जगताप यांनी पुनावळेमधील ट्रीन आर्क सोसायटी, श्रेयांश सोसायटी, जीके रोज मेन्शन, सरिशा, वि जे यशवन इन्फिनिटी, लेगसी उर्बनिया, पुणेवीले, सोमानी ड्रीम् होम, आकाशवन, वर्धमान पाम रोज, स्टांझा यासह अनेक सोसायट्यांना भेट देऊन तेथील रहिवाशांसोबत संवाद साधला.

यावेळी सोसायटी धारक म्हणाले की, ज्या पद्धतीने



आमदार अश्विनी जगताप आणि शंकर जगताप यांच्या पाठपुराव्यामुळे येथील सर्वात गहन कचरा डेपोचा प्रश्न मार्गी लागला, त्याबद्दल पुनावळे गावातील प्रत्येक नागरिक तुमचा आभारी आहे. आणि यापुढेही पुनावळे गावातील सर्व समस्या सोडवून गावाचा स्मार्ट विकास करण्यासाठी पुनावळे गावातील आम्ही सर्व सोसायटीधारक एकदिलाने आणि एकजुटीने शंकर जगताप यांच्यासोबत आहोत, असा विश्वास उपस्थित सर्व सोसायटीधारकांनी अश्विनी जगताप यांना दिला.

या दौऱ्या दरम्यान शिक्षण मंडळ माजी सभापती चेतन भुजबळ, राष्ट्रवादी पिंपरी चिंचवड शहर उपाध्यक्ष राजीव क्षीरसागर, सुरेश रानवडे, नवनाथ ढवळे, विठ्ठल बरळ, सौरभ बिडवाई, अजित भोसले, अनिल वांबोरी, मुनमुन पोदार, ट्विन आर्क सोसायटीचे चेअरमन सचिन भोसले, अशोक हराळे, विवेक पाटील, श्रीकांत गायकवाड, विजय टंडन, संकेत शर्मा, अमित खांडवे, श्रीयांस सोसायटीचे चेअरमन हर्ष मालवी, अजय निकम, अमित नवबते, सरिशा सोसायटीचे विनायक थोरात, विष्णू मोहिते, हितेश बांदल, गणेश कदम, अंशुमन दुबे, श्रेया १,२ सोसायटीचे विनायक गावडे, स्वप्निल भामरे, प्रसाद कुलकर्णी, विकास सूर्यवंशी, जीके रोज मेन्शन सोसायटीचे लक्ष्मण व्यवहारे, कुशाग्र शर्मा, सेंटोसा सोसायटीचे सुरेश कोल्हे, चंद्रकांत महाजन, श्री,सोनार, श्री. पांढरे यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आमदार अण्णा बनसोडे यांच्या प्रचारासाठी भाऊ कदम यांची पिंपरीत पदयात्रा

## आमदार अण्णा बनसोडे हेच पुन्हा बहुमतांनी विजयी होतील, अशी खात्री भाऊ कदम यांनी व्यक्त केली.

**पिंपरी | प्रतिनिधी**

राष्ट्रवादी, भाजप, शिवसेना, आरपीआय (आठवले), रासप या महायुतीचे पिंपरी विधानसभेचे उमेदवार आमदार अण्णा बनसोडे यांच्या प्रचारासाठी हास्य कलाकार, अभिनेते भाऊ कदम पिंपरीत आले. आमदार अण्णा बनसोडे हेच पुन्हा बहुमतांनी विजयी होतील, अशी खात्री भाऊ कदम यांनी व्यक्त केली.

महायुतीचे उमेदवार आमदार अण्णा बनसोडे यांनी मंगळवारी (दि. 12) चिंचवड परिसरातील रामनगर, शंकर नगर, दत्तनगर, विद्यानगर, परशुराम नगर या भागात पदयात्रा काढली. पदयात्रेमध्ये चला हवा येऊ द्या फेम हास्य कलाकार भाऊ कदम यांनी सहभाग घेतला. रामनगर येथील राम मंदिरापासून पदयात्रेला सुरुवात झाली. सुरुवातीपासून भाऊ कदम पदयात्रेत सहभागी झाले. संपूर्ण परिसरात त्यांनी उपस्थिती लावली.

यावेळी माजी महापौर दिनकर दातीर, मंगला कदम, वैशाली काळभोर, राजू दुर्गे, नारायण बहिरवडे, सुप्रिया चांदगुडे, दिपाली कारंजकर, प्रेमा दातीर, जयश्री दातीर, भारती मोहिते, साधना दातीर, ज्योती दातीर, दिलीप दातीर, राजेश वाबळे, गणेश लंगोटे, सय्यद पटेल, राहुल दातीर, गजराबाई मोरे, गेंदाबाई कांबळे, सत्यविजा कांबळे आणि महायुतीतील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



भाऊ कदम म्हणाले, आमदार अण्णा बनसोडे हे प्रचंड बहुमताने विजयी होतील. पिंपरीतील मतदारांनी अण्णा बनसोडे यांना विजयी करून राज्यामध्ये महायुतीची ताकद वाढवावी असे आवाहन देखील भाऊ कदम यांनी केले.

अण्णा बनसोडे यांना चांगला प्रतीसद मिळत आहे. अजित पवार म्हणतात, ‘आम्ही विचारांचे वारकरी वाहतो विकासाची पालखी’, त्यामुळे जनतेला अजित पवार यांच्या कामाची पद्धत चांगल्या प्रकारे माहिती आहे. अजित पवार मुख्यमंत्री होणार. अजित पवारांनी चांगले काम केले आहे त्यामुळे चांगले काम करणारे उमेदवार मुख्यमंत्री झाले तर केव्हाही चांगले असेही भाऊ कदम म्हणाले.

# अनधिकृत बांधकामांना पुन्हा शास्तीकर लागू

## सरसकट माफी न झाल्याने नागरिकांमध्ये नाराजी : अनधिकृत बांधकामे वाढली

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिका हद्दीत अनधिकृत बांधकामांना सरसकट शास्तीकर माफ करावा, म्हणून पिंपरी-चिंचवडमधील नागरिक मागणी करत होते. मात्र, सरसकट शास्तीकर माफ न करता ३ मार्च २०२३ पूर्वीच्या बांधकामांचा शास्तीकर माफ करताना मूळ थकीत मालमत्ताकर भरण्याची अट घालण्यात आली. त्यामुळे मूळ मालमत्ता थकीत कर न भरल्यामुळे अनेक बांधकामांना शास्तीकर माफी मिळालीच नाही. तसेच शहरातील ४ मार्च २०२३ नंतरच्या सर्व नवीन आणि वाढीव अनधिकृत बांधकामांना पूर्वीप्रमाणे दुप्पट शास्तीकर लागू करण्यात आला आहे. त्यामुळे शहरातील चिखली, तळवडे, दिघी आणि भोसरी परिसरात वाढलेल्या सर्व अनधिकृत बांधकामांना शास्तीकर पुन्हा लागू झाल्याने नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी व्यक्त होत आहे.




पिंपरी-चिंचवड महानगरपालिका कर आकारणी व कर संकलन विभागाकडून शहरातील इमारत व जमिनीवर मालमत्ताकराची आकारणी करण्यात येते. पालिका अधिनियमातील कलम २६७ अ मधील तरतुदीनुसार महापालिका हद्दीतील ४ जानेवारी २००८ रोजीच्या आदेशानुसार अवैध बांधकामांवर शास्ती रकमेची आकारणी व वसुलीची कार्यवाही करण्यात येत आहे. शहरातील अनधिकृत बांधकामांना लावण्यात आलेला शास्तीकर माफ करण्याचा निर्णय विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात २१ डिसेंबर २०२२ झाला होता.

राज्य सरकारने दोन महिन्यांतर अध्यादेश प्रसिध्द केला. त्यानुसार एक हजार चौरस फुटापर्यंत निवासी बांधकामाला शास्तीकराची आकारणी केलेली नाही. एक ते दोन हजार चौरस फुटापर्यंत निवासी बांधकामांना प्रतिवर्ष मालमत्ताकराच्या ५० टक्के दराने शास्ती लागू केली. दोन हजार चौरस फुटांपुढील निवासी बांधकामांना प्रतिवर्ष मालमत्ताकराच्या दुप्पट दराने शास्ती लागू केलेली आहे. तर सर्व बिगरनिवासी, मिश्र, औद्योगिक मालमत्ता बांधकामांना मालमत्तेच्या दुप्पट शास्ती लागू केली आहे.

मात्र, अनधिकृत बांधकामधारकांनी प्रथम थकीत मिळकतकरांचा भरणा करणे आवश्यक आहे. त्यानंतरच थकीत सर्व शास्तीकर माफ केला जात आहे. शास्तीकर माफी सवलतीचा अध्यादेश हा ३ मार्च २०२३ पर्यंतच्या अनधिकृत बांधकामांना लागू केलेला आहे. त्यानंतरच्या अनधिकृत बांधकामांना शास्तीकर माफी मिळणार नाही. त्यामुळे नव्याने आणि वाढीव झालेल्या अनधिकृत बांधकामांना किंवा ३ मार्च २०२३ पूर्वी नोंद नसलेल्या सर्व अनधिकृत बांधकामांना या योजनेचा लाभ मिळालेला नाही. तसेच, शास्तीकर माफ झाल्याने अनधिकृत बांधकामेदेखील नियमित झालेली नाहीत. त्यामुळे शास्तीकर माफी हा चुनावी जुमला होता का, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

### महापालिकेला 460 कोटी 55 लाखांचा भूर्दंड

» शहरात अनधिकृत बांधकामांना शास्तीकर माफ केल्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार एक हजार फुटांपर्यंतच्या अनधिकृत घरांना या पूर्वीच शास्तीकर माफ करण्यात आला. एक हजार १ ते २ हजार फुटांच्या अनधिकृत घरांना मिळकतकरावर ५० टक्के शास्तीकर माफ केला आहे. असे एकूण १६ हजार ६४४ घरे आहेत. दोन हजार फुटांपुढील आकाराची ३ हजार ७३४ अनधिकृत घरे आहेत. असे एकूण २० हजार ३७८ घरे आहेत. बिगरनिवासी ५ हजार २३५, मिश्र ५ हजार २०७ आणि औद्योगिक ७९६ असा एकूण ११ हजार २३८ अनधिकृत बांधकामे आहेत. त्यासाठी थकीत सर्व मूळ मिळकतकर भरावा लागणार आहे. या योजनेमुळे महापालिकेचे शास्तीकरातून मिळणारे ४६० कोटी ५५ लाखांचा भुर्दंड सहन करावा लागणार आहे.

### मूळ थकीत करामुळे शास्तीची माफी मिळेना

शहरातील अनधिकृत बांधकामांचा शास्तीकर माफ करण्याचा अध्यादेश राज्य सरकारने ३ मार्च २०२३ मध्ये प्रसिद्ध केला. त्या अध्यादेशामुळे शहरातील २० हजार ३७८ अनधिकृत घरे आणि ११ हजार २३८ बिगरनिवासी अनधिकृत बांधकामे असे एकूण ३१ हजार ६१६ बांधकामांना शास्तीकर माफीचा लाभ मिळणार होता. मात्र, शास्तीकर माफीचा लाभ हवा असल्यास त्या बांधकामधारकांनी आतापर्यंतचा सर्व मूळ मिळकतकर भरणे अनिवार्य आहे. त्यामुळे मूळ थकीत करामुळे शेकडो बांधकामधारकांना शास्तीचा लाभ मिळालेला नाही. तसेच, ४ मार्च २०२३ नंतरच्या अनधिकृत बांधकामांवर शास्तीकर पूर्वीप्रमाणेच लागू आहे. शास्तीकर माफ झाला तरी, अनधिकृत बांधकामे नियमित होणार नाहीत, असे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

# शंकर जगतापांसाठी वाल्हेकरवाडीत माहोल रंगला..!

## चिंचवडच्या विकासासाठी शंकर जगतापांसारखे दमदार नेतृत्व हवे : मतदारांचा निर्धार

**पुणे | प्रतिनिधी**

चिंचवड विधानसभा मतदारसंघात भाजप – शिवसेना – राष्ट्रवादी काँग्रेस – आरपीआय (आठवले) मित्रपक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार शंकर जगताप यांच्या प्रचारार्थ वाल्हेकरवाडी, प्रेमलोक पार्क, बिजलीनगर या भागात झंझावाती प्रचार दौरा पार पडला. यावेळी वाल्हेकरवाडी येथे चक्क बैलगाडीतून शंकर जगताप यांची भव्य मिरवणूक काढण्यात आली. त्यामुळे "हा प्रचार दौरा आहे की; भव्य विजयी मिरवणूक"? अशी चर्चा परिसरात रंगली होती.



शंकर जगताप यांच्या प्रचार दौऱ्याला चिंचवड येथील प्रेमलोक पार्क येथून सुरूवात झाली. फटाक्यांची आतिषबाजी आणि ढोल ताशांच्या गजरात नागरिकांनी त्यांचे जंगी स्वागत केले. तसेच जागोजागी नागरिकांनी जगताप यांच्यावर पुष्प वर्षाव केला.

सदर पदयात्रा पुढे इंदिरा नगर, दळवी नगर, रघूमाउली गार्डन, सुखनगरी सोसायटी, गिरीराज सोसायटी, बिजलीनगर, ओम कॉलनी, विवेक वसाहत, शिवनगरी, बळवंत नगर, दगडोबा चौक, चिंचवडे नगर मार्गे वाल्हेकर वाडी, आहेर नगर ते गुरुद्वारा चौक अशी काढण्यात आली. यावेळी जगताप यांनी मतदारांच्या गाठीभेटी घेत त्यांच्याशी संवाद साधत कमळाला मतदान करण्याचे आवाहन त्यांनी केले. तसेच परिसरातील चिंतामणी गणेश मंदिर आणि स्वामी समर्थ मंदिरात दर्शन घेऊन विजयासाठी आशीर्वाद घेतला.

> "चिंचवड आणि वाल्हेकरवाडी भागात यापूर्वी आमदार निधीतून अनेक चांगली विकासकामे झालेली आहेत. मात्र या भागात विकासकामांना अजूनही चांगला वाव असून त्या कामांना मी प्राधान्य देणार आहे. या परिसरात राज्य शासन आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमातून नवीन प्रकल्प आणि योजना आणून मतदार संघ स्मार्ट करण्यावर माझा भर असेल. तसेच मतदार संघात पायाभूत सुविधा निर्माण करू.
>
> – शंकर जगताप (महायुतीचे उमेदवार)

# हिंजवडी आयटी पार्कला जलप्रदूषणासाठी नोटीस

## सामाईक सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पावर प्रदूषण नियंत्रण मंडळाचा ठपका

**पुणे | प्रतिनिधी**

हिंजवडीतील राजीव गांधी इन्फोटेक (आयटी) पार्ककडून जलप्रदूषण होत असल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. आयटी पार्कमधील समाईक सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पातील सांडपाणी मुळा नदीत थेट सोडण्यात येत असल्याचा ठपका महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने ठेवला आहे. याप्रकरणी आयटी पार्कला नोटीस बजाविण्यात आली आहे.



प्रदूषित पाण्यामुळे मुळा नदीतील माशांचा मृत्यू झाल्याचा प्रकार उघडकीस आला होता. याची दखल घेऊन महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने आयटी पार्कमधील समाईक सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाची २४ सप्टेंबरला तपासणी केली. या तपासणीत प्रकल्पाच्या ठिकाणी अनेक गंभीर त्रुटी आणि नियमांचे उल्लंघन आढळून आले. सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाची क्षमता प्रतिदिन ४ मेगालिटर असताना प्रत्यक्षात हा तिथे प्रतिदिन १.५ मेगालिटर सांडपाण्यावर प्रक्रिया केली जात असल्याचे आढळून आले. आयटी पार्कमध्ये सांडपाणी वाहिन्यांचे जाळे अपुरे असल्याने हा प्रकल्प कमी क्षमतेने सुरू आहे, असे मंडळाने नोटिशीत म्हटले आहे.

सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पातील अनेक विभाग बंद आहेत. याचबरोबर साठवण टाक्या योग्य स्थितीत नसल्याने सांडपाण्याची दुर्गंधी प्रकल्पाच्या आवारात सगळीकडे पसरली आहे. प्रकल्पाच्या ठिकाणी निर्जंतुकीकरण यंत्रणा नाही. प्रक्रिया केलेल्या पाण्याचा पुनर्वापर केला जात नाही. सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पातून दररोज प्रक्रिया केलेल्या पाण्याचे केवळ ८ ते १० टँकर बाहेर पाठविले जातात. इतर सर्व अर्धवट प्रक्रिया केलेले पाणी थेट मुळा नदीत सोडले जाते. प्रकल्पाच्या बाहेरील सांडपाणी वाहिन्या फुटलेल्या अवस्थेत आहेत, असे नोटिशीत नमूद करण्यात आले आहे.

नोटिशीला उत्तर देण्यास महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला सात दिवस देण्यात आले असून २२ नोव्हेंबरला मंडळाच्या कार्यालयात प्रत्यक्ष हजर राहून माहिती देण्याची सूचना करण्यात आल्याचे प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी जगन्नाथ साळुंखे यांनी सांगितले. तर आयटी पार्कमधील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प त्रयस्थ संस्थेमार्फत चालविला जातो. त्यांच्याकडून याबाबत माहिती घेतली जाईल. त्यानंतर नोटिशीला योग्य उत्तर दिले जाईल, असे एमआयडीसीचे कार्यकारी अभियंता संजय इंदुले यांनी स्पष्ट केले.

### तीन महिन्यांत तीन नोटिसा

» महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने गेल्या तीन महिन्यांत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला (एमआयडीसी) तीन वेळा नोटीस बजावली आहे. सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाबाबत या नोटिसा आहेत. कुरकुंभ एमआयडीसीला सप्टेंबरमध्ये, रांजणगाव एमआयडीसीला ऑक्टोबरमध्ये आणि आता हिंजवडी आयटी पार्कला नोटीस बजाविण्यात आली आहे. यामुळे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि एमआयडीसी आमनेसामने आले आहेत.

# पोलिसांच्या मेगासिटीसाठी 600 कोटींची गुंतवणूक

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा पाठपुरावा : साडेपाच हजार पोलिसांना मिळणार दिलासा

**पुणे | प्रतिनिधी**

सुमारे १२ वर्षांपासून रखडलेला लोहगाव येथील महाराष्ट्र पोलीस मेगासिटी कॉर्पोरेशनचा (एमपीएमसी) गृहनिर्माण प्रकल्प कार्यान्वित होणार आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मागील वर्षभराच्या पाठपुराव्यामुळे नेदरलँड स्थित निमशासकीय संस्थेच्या माध्यमातून ६०० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीची टर्मशीट 'एमपीएमसी'कडे हस्तांतरित करण्यात आली. यामुळे लवकरच साडे पाच हजार पोलीस बांधवांच्या घरांचे स्वप्न साकार होण्यास मदत मिळणार आहे.





रूरल एन्हान्सर्स संस्थेचे प्रमुख व विदेशी गुंतवणुकीचे समन्वयक अंबर आयदे यांनी याबाबत ‘सीविक मिरर’ला माहिती दिली. रूरल एन्हान्सर्समार्फत शनिवारी विमाननगर येथे 'एमपीएमसी'च्या पदाधिकाऱ्यांना या गुंतवणुकीची टर्मशीट अटल कन्सल्टिंगचे भारतातील प्रकल्प व्यवस्थापक अनिल कुमार कुप्पा यांनी हस्तांतरित केली. यावेळी अटल कन्सल्टिंग नेदरलँडचे व्यवस्थापकीय संचालक श्रीहान बाटले हे व्हीडीओ कॉलच्या माध्यमातून उपस्थित होते. सोबत रूरल एन्हान्सर्सचे प्रमुख अंबर आयदे, 'एमपीएमसी'चे अध्यक्ष भरतकुमार राणे उपस्थित होते.

अंबर आयदे म्हणाले, “महाराष्ट्रातील पोलिसांच्या ५ हजार २४८ घरांचा आणि १६० दुकानांचा ११७ एकरांवरील हा प्रकल्प २०१२ पासून रखडलेल्या अवस्थेत होता. पोलीस बांधवांच्या घरांसाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः लक्ष घालून, राज्य शासनाचे एफडीआय प्रमुख आणि जॉईंट सेक्रेटरी कौस्तुभ धावसे यांनी ‘एमपीएमसी’च्या प्रकल्पासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावरील वित्तीय पुरवठा करणाऱ्या संस्थांकडून गुंतवणूक आणण्याची जबाबदारी सोपवली होती. मुंबईतील शासकीय निवासस्थानी नेदरलँडस्थित संस्थांचा आणि उपमुख्यमंत्री कार्यालयाचा गुंतवणूक सोहळा झाला होता. फडणवीस यांच्या मार्गदर्शनातून ही गुंतवणूक आली आहे.

बीईबिलो मोरया कंपनीने बांधकाम गुणवत्तेसाठी फिनलँड देशातील प्रीकास्ट काँक्रिट तंत्रज्ञान व एलिमॅटिक तंत्रज्ञानाचा वापर करून संपूर्ण प्रोजेक्ट प्री-कास्टच्या माध्यमातून पूर्ण करण्याची हमी 'एमपीएमसी' यांच्यासोबत झालेल्या करारनाम्यामध्ये दिली होती. त्यानुसार लोहगाव येथे प्रीकास्टिंग फॅक्टरी उभारण्यात आली होती. 'एमपीएमसी' प्रकल्पाच्या पहिल्या व दुसऱ्या टप्प्यांमध्ये जवळपास ५ हजार २४८ सदनिका व जवळपास १६० दुकाने हस्तांतरण करणे या प्रकल्पाचे विकासक मोरिया यांना बंधनकारक होते. काही कारणांनी हा प्रकल्प २०१६ मध्ये अर्धवट अवस्थेत रखडला. पैसे भरलेले पोलीस बांधव अडकून पडले आणि दुर्भाग्यवश कोरोना काळामध्ये यामधील बऱ्याच सदनिकाधारकांचा मृत्यू झाला.

### काय आहे हा प्रकल्प?

» महाराष्ट्र पोलीस मेगासिटी अर्थात 'एमपीएमसी' अंतर्गत पुण्यातील लोहगाव येथे पोलिसांसाठी गृहनिर्माण प्रकल्प उभारण्याचा निर्णय २०१० मध्ये झाला होता. प्रकल्पाच्या विकासासाठी तत्कालीन, राज्य शासनाद्वारे बीईबिलो मोरया कंपनीची नियुक्ती झाली होती. बांधकाम व्यवस्थापनाच्या सुनिश्चितीसाठी बीईबिलो मोरया आणि 'एमपीएमसी' यांनी 'बेबेन को डेव्हलपर्स' (बीडीएल) नावाने 'एसपीव्ही' स्थापन केली. त्या अंतर्गत २७० कोटी रुपयांचा भरणा केला. लोहगाव येथे ११७ एकर जमीन विकत घेऊन हा प्रकल्प विकसित करण्याचे ठरले. प्रकल्पाच्या डिझाईनची जबाबदारी 'बीडीएल'ने 'व्हीके आर्किटेक्ट्स'कडे सोपवली होती.